# बृहन्मुंबई महानगरपालिका

# विधि खाते

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार

दिनांक ०१.०१.२०२० पर्यंत अद्ययावत केलेली पुस्तिका

(सन २०१९-२० करिता)

कायदा अधिकारी

विधि खाते

यांचेद्वारा प्रकाशित

# <u>अनुक्रमणिका</u>

| अ. क्र. | विषय |
|---|---|
| 1 | प्रस्तावना , |
| 2 | 1. खात्याची संघटना कार्ये आणि कर्तव्ये ह्याबाबतचा तपशील |
| 3 | 2. खात्याच्या अधिका-यांना आणि कर्मचा-यांना प्रत्यायुक्त केलेले अधिकार आणि त्याची कर्तव्ये . |
| 4 | 3. पर्यवेक्षणाची उतरंड आणि उत्तरदायित्व ह्यांसह निर्णय घेण्याकरिता अवलंबिण्यात येणारी कार्यपध्दती. |
| 5 | 4.खात्याची (कार्ये) कर्तव्य पार पाडण्याकरिता निश्चित करण्यात आलेले निकष. |
| 6 | 5. आपले कार्य पार पाडण्याकरिता सदर खात्याकडे असलेले किंवा सदर खात्याच्या नियंत्रणाखाली असलेले किंवा सदर खात्यातील कर्मचारी वापर करीत असलेले नियम, विनियम, सूचना, हस्तपुस्तिका आणि अभिलेख. |
| 7 | 6. सदर खात्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या खात्याच्या ताब्यातील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरण. |
| 8 | 7. जनतेसमवेत सल्लामसलत करुन अथवा सहभागाने खात्याचे धोरण निश्चिती किंवा अंमलबजावणीकरिता अस्तित्वात असलेल्या कोणत्या व्यवस्थेचा तपशील. |
| 9 | 8. मंडळे, परिषदा, समित्या आणि त्याचाच एक भाग म्हणून किंवा त्याच्या सल्ल्याकरिता, दोन किंवा अधिक व्यक्तिंचा समावेश असलेल्या घटित केलेल्या संस्थांचे विवरण आणि अशी मंडळे, परिषदा, समित्या आणि संस्थांच्या सभा जनतेकरिता खुल्या असतात का? किंवा अशा सभांचे सभा वृत्तांत जनतेला (सहज) उपलब्ध असतात का याविषयी. |
| 10 | 9. खात्याचे अधिकारी आणि कर्मचारी ह्यांची निर्देशिका |
| 11 | 10. नियमावलीत तरतूद केल्यानुसार मिळणा-या नुकसान भरपाईसह खात्याच्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन. |
| 12 | 11. सर्व आराखड्यांचा नियोजित खर्चाचा तपशील व संवितरणाचे अहवाल दर्शविणारा, खात्याचा प्रत्येक उपविभागाला वाटणी करण्यात आलेली अर्थसंकल्पातील तरतूद. |
| 13 | 12. वाटप करण्यात आलेली रक्कम आणि अशा कार्यालयातील लाभार्थीच्या तपशीलासह सवलत कार्यक्रमाची कार्यान्वितीकरण पध्दत. |
| 14 | 13. खात्याने जारी केलेल्या प्राधिकारपत्र सवलती, परवाने लाभधारकांचा तपशील. |
| 15 | 14. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचे उदधृत केलेली मनपाकडील उपलब्ध माहिती किंवा माहितीचा तपशील. |
| 16 | 15. माहिती प्राप्त करण्याकरिता नागरिकांना वाचनालय किंवा वाचनकक्ष (असल्यास) त्यांच्या वेळांसह उपलब्ध सुविधांचा तपशील. |
| 17 | 16.सार्वजनिक माहिती अधिका-यांची नाव, पदनामे आणि इतर तपशील |
| 18 | 17.विहित केल्याप्रमाणे इतर माहिती |

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्यांन्वये भारतीय प्रशासनाच्या इतिहासात एक नवीन अध्याय जोडला गेला. नागरिकांच्या हितासाठी आपल्या सारख्या अवाढव्य लोकशाही राष्ट्राने उत्क्रांतीचे एक पाऊल टाकले आहे. ज्यात कारभारातील राज्य प्रणालीवर एक अदयरुत अंकुश ठेवण्यासाठी हा कायदा प्रचारात आणला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्यान्वये प्रशासन आणि संस्थाच्या धोरणे, नियम, कर्तव्ये आणि कामे आणि इतर तपशील यांची साद्यंत माहिती नागरिकांना उपलब्ध होण्यासाठी हा कायदा आहे. याचे गोषवारा शिर्षक खालीलप्रमाणे आहे.

**कायदा आणि न्याय मंत्रालय**
**(वैधानिक विभाग)**

नवी दिल्ली, दिनांक २१ जून, २००५ / जेष्ठ ३१, १९२७ (शके)

१५ जून २००५ रोजी पार्लमेंटच्या या कायद्याला राष्ट्रपतींनी अधिमान्यता दिली आणि आता तो सर्वसामान्य माहितीसाठी प्रसिद्ध झाला.

**माहितीचा अधिकार कायदा, २००५**
**(दिनांक २००५ चा क्र.२२) (१५ जून २००५)**

सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी आणि जबाबदारीची जाणीव होण्यासाठी, तसेच केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग यांच्या संविधानासाठी तसेच या माहितीशी निगडीत बाबी अथवा प्रासंगिक बाबींसाठी आणि जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येते ती माहिती सर्वसामान्य नागरिकांना खुल्या राजमार्गाने उपलब्ध होण्यासाठी ह्या कायद्याद्वारे वास्तवदर्शी राजवट म्हणून तरतूद केलेली आहे.

----------

- हे निदेशपुस्तक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ (एक) (ब) मधील तरतूदीनुसार प्रसिद्ध करण्यात आले आहे.

- या निदेशपुस्तकाचा उद्देश विविध अधिनियम, नियम आणि विनियम यामधील तरतुदीनुसार विधि खात्याची रचना, कामे आणि कर्तव्ये यांचे तपशील, या खात्यामधील कर्मचारी, अधिकारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये तसेच कामे पार पाडण्यासाठी निश्चित करण्यात आलेले निकष यासंबंधीची माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचा आहे.

- विधि खात्याच्या कामकाजाची माहिती ज्या नागरिकांना मिळविण्याची इच्छा आहे त्यांच्या वापरासाठी हे निदेशपुस्तक प्रकाशित करण्याचा उद्देश आहे.

- या निदेशपुस्तकात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ (एक) (ब) च्या तरतुदीन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अनुक्रमणिकेत नमूद केलेल्या विषयासंबंधी १७ मॅन्युअल्सचा अंतर्भाव आहे.

- या निदेशपुस्तकात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही विषयासंबंधी स्पष्टीकरण अथवा माहिती हवी असल्यास कृपया खालील अधिकाऱयांशी संपर्क साधावा.

कायदा अधिकारी, विधि खाते
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, रुम नं.३११, तिसरा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६२०२५१ (वि.क्र.४४८५/४३३१)
२२७५४४८५ (थेट)
मोबाईल क्र.३३६७५९१३१४
ईमेलः- lo01.legal@mcgm.gov.in

- ज्या व्यक्तीला माहिती मिळविण्याची इच्छा आहे तिने या बाबतीत विहित केलेल्या शुल्कासह अधिकृत भाषेत (राजभाषेत) लेखी स्वरुपात किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्याद्वारे विनंती करावी.

**क्रं.एलओ/एलइए/६८९**
**दि.२२.०१.२०२०**

**सही/-**
**दि.२२.०१.२०२०**
**कायदा अधिकारी**
**विधी खाते**